# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०९.०१.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०८/०१/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १५,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०८/०१/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ४,८००/— रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ०८/०१/२०२४ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०६ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ४९,०६०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.